नियमित फौजदारी खटला नं.८४२/२०२०
निशाणी- ३६

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा जबाब.</u>

मी शपथेवर कथन करतो की,

माझे नांवः- राजेंद्र जयसिंगराव पवार

वयः- ६१ वर्षे, धंदाः- वैद्यकिय व्यवसाय

राहणारः- वसंत टेकडी, अहिल्यानगर

<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-</u>

१. दि. १२/१२/२०१६ रोजी दुपारी २.३० वा. सुमारास माझा मुलगा निरामय हा त्याचे कामानिमीत्त जवळच असलेल्या श्रीराम चौकात गेला होता. त्यावेळेस तेथे त्याचे ओळखीचे अक्षय विलास वाडेकर, संकेत विलास वाडेकर व अजुन दोन व्यक्ती दोन मोटार सायकलवर तेथे होते. त्यापैकी अक्षय वाडेकर व संकेत वाडेकर यांनी मुलास त्याचे जवळ बोलावुन घेतले. त्यांनी माझ्या मुलाला त्यांचे महत्वाचे काम त्याचेकडे आहे असे म्हणुन गोड बोलुन त्याला शिवनेरी अर्पाटमेंट, नालेगांव, चौपाटी कारंजाजवळ त्याचे घरी घेऊन गेले. त्यानंतर त्यांनी माझ्या मुलास आमची बहिण साक्षी हिस मिसकॉल देतो व फोन करतो म्हणुन वाद सुरु केला. त्यानंतर संकेत वाडेकर याने माझ्या मुलास जड व टणक वस्तुने गालावर, चेह-यावर व तोंडवर मारले. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण सुरु केली. सदर प्रकार साधारणतः दुपारी ३.३० वा. सुमारास झाला. यानंतर मुलाने कशीबशी त्याचे तावडीतुन सुटका केली आणि बाजुला जाऊन मला फोन करुन घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर मी ताबोडतोब नालेगांव येथे मुलाकडे गेलो व त्याला घेऊन तोफखाना पोलीस स्टेशनला गेलो. तेथे आम्ही घडलेला सगळा प्रकार पोलिसांना सांगितला. पोलिसांनी आम्हाला यादी देऊन सरकारी दवाखान्यात पाठविले. त्यानंतर माझ्या मुलाने आरोपीं विरुध्द कायदेशीर फिर्याद दिली. पोलिसांनी माझी चौकशी करुन माझा जबाब नोंदविला. मी आरोपींना पाहिले असता ओळखु शकतो. आज संकेत विलास वाडेकर न्यायालयात उपस्थित आहे.

सरतपास पूर्ण.

<u>उलट तपास आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. ए. ए. निबाळकर यांचेकडूनः-</u>

२. हे म्हणणे खरे आहे की, मी वसंत टेकडी येथे राहत असलेल्या ठिकाणी माझे मोठे हॉस्पीटल आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वैद्यकिय व्यवसाय करत असल्यामुळे

नगर शहरातील तसेच सरकारी दवाखान्यातील डॉक्टर माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी संकेतला घटनेच्या अगोदर बघितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेनंतर सुध्दा संकेतला बघितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा निरामय हा संकेतची बहिण साक्षी हिचा पाठलाग करायचा, छेडछाड करायचा त्यामुळे संकेतने ब-याचदा त्याला समाजवुन सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी सुध्दा आरोपींनी माझ्या मुलाला समजावुन सांगितले असता त्याने ऐकले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या मुलाला असे वाटले त्याचे विरुध्द छेडछाडीचा गुन्हा दाखल होईल त्यामुळे गाडीवरुन जोराने जात असताना तो खाली पडला व त्याला जखमा झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाने मला त्याचे सोबत घडलेला कुठलाही प्रकार सांगितला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकुर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, संकेतने माझ्या मुलाला कुठल्याही प्रकारची मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.02.17 18:02:31 +0530

(एल.एस.पाढेण)

दि.१७/०२/२०२६.

मुख्य न्यायदंडाधिकारी

अहमदनगर.